**भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७५ अन्वये आरोपीस सांगावयाचा अपराधाचा तपशील**

**धुळे येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र.४), धुळे यांचे न्यायालयात**

**सं.फौ.ख. क्र. २०२६/२०२६**
**निशाणी क्र. ०३**

| | | |
|---|---|---|
| १. अपराध घडल्याचा दिनांक | – | १२.०८.२०२६ |
| २. तक्रार दाखल केल्याचा दिनांक | – | १२.०८.२०२६ |
| ३. फिर्यादीचे नांव व पत्ता | – | महाराष्ट्र शासन<br>देवपूर पोलीस स्टेशन, धुळे. |
| ४. आरोपीचे नांव व पत्ता | – | **समाधान रामदास चंदनशिव,**<br>वय – ३२ वर्षे, व्यवसाय – भेळपुरी विक्री,<br>रा. रमाबाई आंबेडकर नगर, देवपुर, धुळे. |

गुन्हयाचा तपशीलः –

दिनांक १२.०८.२०२६ रोजी १९.०० वाजेच्या सुमारास धुळे शहरातील सावरकर पुतळा येथे रस्त्यावर सार्वजनिक जागी तुम्ही भेळपुरी विक्रीचा व्यवसाय करुन सार्वजनिक ठिकाणी मुख्य येण्या जाण्याचे रस्त्यावर रहदारीस अडथळा निर्माण करुन येणा–या जाणा–या वाहनांना तसेच पादचारी यांचे जिवितास धोका निर्माण होईल असे हयगयीचे वर्तन किंवा कृत्य करुन उपद्रव करतांना मिळून आलात म्हणून तुम्ही **भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २८५** अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला आहे.

आरोपीचे निवेदनः –

प्रश्न क्र.१ तुम्हांस कागदपत्रांच्या प्रती मिळाल्या काय ?
उत्तर – होय.
प्रश्न क्र.२ तुम्हांस अपराधाचा तपशील समजला काय ?
उत्तर – होय.
प्रश्न क्र.३ तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?
उत्तर – होय.

---------------

आरोपीची सही / अंगठा

समक्ष,

SWAPNA TUKARAM GHULE

Digitally signed by SWAPNA TUKARAM GHULE
Date: 2026.08.20 17:44:47 +0530

(एस. टी. घुले )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, धुळे
(न्यायालय क्र.४)

दिनांक – २०.०८.२०२६

## <u>न्यायनिर्णय</u>

आरोपीस गुन्हयाचा तपशील वाचून व समजावून सांगण्यात आला. आरोपी भेळपुरी विक्रीचा व्यवसाय करुन सार्वजनिक ठिकाणी मुख्य येण्या जाण्याचे रस्त्यावर रहदारीस अडथळा निर्माण करुन येणा–या जाणा–या वाहनांना तसेच पादचारी यांचे जिवितास धोका निर्माण होईल असे कृत्य करुन उपद्रव करतांना मिळुन आला. आरोपी स्वतःहून गुन्हा कबूल करीत आहे अशी माझी खात्री झाली आहे.

आरोपीने या प्रकरणी त्याची आर्थिक परिस्थिती नाजूक आहे असे सांगून कमीत कमी शिक्षा देण्याची विनंती केली. गुन्ह्याचे स्वरुप, आरोपीची विनंती तसेच सदर कायद्याचे कलम २८५ मधील तरतुदींचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. आरोपी **समाधान रामदास चंदनशिव** यास भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७५ अन्वये भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २८५ अन्वये दंडनीय गुन्हयासाठी दोषी धरण्यात येत आहे.

२. आरोपीने सदर गुन्हयाबाबत **रक्कम रुपये ३००/– (अक्षरी तीनशे दोनशे मात्र)** इतका द्रव्य अदा करावा अशी शिक्षा त्यांना ठोठावण्यात येत आहे. दंडाची रक्कम न भरल्यास आरोपीने चार दिवस साध्या कारावासाची शिक्षा भोगावयाची आहे.

SWAPNA TUKARAM GHULE

Digitally signed by SWAPNA TUKARAM GHULE
Date: 2026.08.20 17:44:53 +0530

ठिकाण:– धुळे.
दिनांक – २०.०८.२०२६

(एस. टी. घुले )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, धुळे
(न्यायालय क्र.४)

**प्रमाणपत्र**

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकूरातील शब्द न शब्द मूळ आदेशाप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – जी. एस. अहिरे, |
| न्यायालयाचे नांव | – न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग धुळे. (न्यायालय क्र.४) |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. | – २०.०८.२०२६. |

सही/–
लघुलेखक (श्रेणी – ३)